जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - १९३ दिनांक -२९/०३/२०२४

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

### शिक्षणाकरीता आला अन् शिकला लॅपटॉप चोरीचे धडे

दिनांक २०/०१/२०२४ रोजी वारजे माळवाडी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान गोपनीय बातमीदारांचे बातमीवरून लॅपटॉप चोरी करणाया **तेजस दत्तात्रय सुर्यवंशी, वय- २३ वर्षे, रा. मगनपुरा, नवमोंढा, जि. नांदेड** या इसमाला ताब्यात घेतले. आरोपी तेजस सुर्यवंशी हा सुमारे ०१ वर्षापासून पुणे येथे डिएमएलटीचे शिक्षण घेण्यासाठी आला आहे. तो शिक्षणासोबत झोमॅटो कंपनीमध्ये डिलेव्हरी बॉयचे काम करायचा. डिलेव्हरीचे काम करता करता त्याने कोणत्या ठिकाणी मुलांचे होस्टेल्स आहेत, होस्टेल मधील मुले कधी बाहेर जातात, कधी रुमवर परत येतात याची माहिती मिळवली. त्यानंतर त्याने संधी साधून सदर होस्टेलवर जावून तेथे राहणाया मुलांचे लॅपटॉप व मोबाईल चोरी करण्यास सुरुवात केली.

वारजे माळवाडी तपास पथकाने त्याचेकडे तपास करून त्याने चोरी केलेले एकूण ०९ लॅपटॉप, ०३ मोबाईल फोन व ०१ मोटारसायकल हस्तगत करून वारजे माळवाडी पोलीस स्टेशन गुरनं ३९/२०२४ भादवी कलम ३८० प्रमाणे तसेच पुणे शहरात विविध पोलीस स्टेशनला लॅपटॉप चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन एकुण ४,६२,८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ- ०३, पुणे शहर, श्री संभाजी कदम, मा. सहा. पोलीस आयुक्त, कोथरुड विभाग, पुणे शहर श्री. भिमराव टेळे यांचे आदेशाने वारजे माळवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) निळकंठ जगताप यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. रणजित मोहिते, पोलीस उपनिरीक्षक श्री. रामेश्वर पार्वे तसेच अंमलदार पोलीस हवालदार प्रदिप शेलार, भुजंग इंगळे, पोलीस कॉन्स्टेबल विजय भुरुक, बंटी मोरे, मनोज पवार, श्रीकांत भांगरे, संभाजी दराडे, विक्रम खिलारी, शिरीष गावडे, अजय कामठे, शरद पोळ, सत्यजित लोंढे व रियाज शेख यांनी केलेली आहे.


अधिसुचना
१) पोनि (गुन्हे) कक्ष
२) पासपोर्ट
३) गोपनीय
३) अर्ज/बारनिशी